# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:27.05.2026** **वार:बुधवार**

1. सावंतवाडी रेल्वे स्थानकाला मधू दंडवते यांचं नाव देण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
2. राज्यातल्या 89 हजार 731 कोटी रुपयांच्या पाच विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्याचा राज्य सरकारचा निर्णय
3. इंधनाची साठेबाजी रोखण्यासाठी नागरी पुरवठा विभाग आणि गृहविभाग कारवाई करणार असल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती
4. लोकसंख्याशास्त्रीय आव्हानाच्या निवारणासाठी केंद्र सरकारकडून उच्चस्तरीय समिती स्थापन आणि
5. महाराष्ट्र साहित्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ लेखिका प्रतिभा रानडे यांना प्रदान.

**मंत्री मंडळ निर्णय**

कोकण रेल्वेचे शिल्पकार, माजी रेल्वेमंत्री आणि अर्थमंत्री, ज्येष्ठ नेते मधू दंडवते यांचं नाव सावंतवाडी रेल्वे स्थानकाला देण्याच्या प्रस्तावाला काल झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. आता हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्यात येईल; केंद्राच्या मान्यतेनंतर, सावंतवाडी रेल्वे स्थानकाचे नाव 'लोकमान्य मधू दंडवते रेल्वे टर्मिनस' असे होणार आहे.

देशात सुरु असलेल्या जनगणनेच्या पार्श्वभूमीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या 2026 मधील सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ देण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयानुसार, आता शासनाला 30 जून 2026 पर्यंत बदली प्रक्रिया राबवता येणार आहे.

**प्रकल्प गुंतवणूक**

राज्यात औद्योगिक गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि आधुनिक औद्योगिक परिसंस्था विकसित करण्याच्या दृष्टीने सुमारे 89 हजार 731 कोटी रुपयांच्या पाच विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्याचा निर्णय काल राज्य सरकारनं घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्योग विभाग मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पांमुळे राज्यात अंदाजे 20 हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असून विदर्भ, मराठवाडा, नाशिकसह राज्यातील विविध भागांमध्ये औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**मुख्यमंत्री-इंधन साठेबाजी**

राज्यात पेट्रोल आणि डिझेलची मागणी लक्षणीयरीत्या वाढली असून साठेबाजी थांबवण्यासाठी नागरी पुरवठा विभाग आणि गृहविभाग संयुक्त कारवाई करेल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. ते काल मुंबईत पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले.....

**एकीकडे शेतकऱ्यांना डिझेल मिळालं पाहिजे याकरता आपण प्रयत्न करतो आहोत पण निश्चितपणे त्याचा फायदा किंवा गैरफायदा हा काही लोकं घेताय यात दोन गोष्टी महत्वाच्या आहेत एकीकडे नॉर्मल पेट्रोल डिझेल ची खपत वाढलेली आहे आणि त्याच वेळी कमर्शियल जे ऑइल आहे पेट्रोल डिझेल आहे याची खपत मात्र थोडी कमी होताना दिसते आहे याचा अर्थ नॉर्मल ही जी वाढलेली त्या ठिकाणी खपत आहे ती कमर्शियल कडे वळवली जाते आहे का याची पडताळणी करणं गरजेचं आहे त्या दृष्टीनं आज आम्ही आदेश दिलेले आहेत कारण आपण समजू शकता बावन्न टक्के वाढ आणि त्याची आपूर्ती आपण करतो आहोत याचा अर्थ कुठेतरी याच्यामध्ये कोणीतरी साठेबाजी करत आहे आणि म्हणून ती साठेबाजी थांबवण्याचा प्रयत्न आमचा चाललेला आहे.**

**कांदा-दर**

कांदा उत्पादकांना न्याय मिळवून देण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असून, कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांचे नुकसान होऊ दिले जाणार नाही, अशी ग्वाही देखील मुख्यमंत्र्यांनी काल दिली. या बाबतीत दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी केंद्र सरकारशी चर्चा करणार आहे; यावर विरोधकांनी राजकारण करू नये, असं ते म्हणाले.

**कांदा-आंदोलन**

दरम्यान, कांद्याला 24 रुपये प्रति किलो किमान भाव मिळावा यासाठी काल नाशिक जिल्ह्यातील चांदवड इथे, महाविकास आघाडीच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं. या आंदोलनात, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आमदार रोहित पवार, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांच्यासह अन्य नेते आणि शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**पंतप्रधान-12 वर्षे कार्यकाल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाचा कार्यभार स्वीकारला त्या घटनेला काल 12 वर्षे पूर्ण झाली. 26 मे 2014 रोजी मोदी यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या 12 वर्षांत, 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास' या तत्त्वांवर आधारित, अनेक लोकभिमुख उपक्रम राबवले आहेत. या काळात, केंद्र सरकारने परराष्ट्र धोरण, दहशतवादविरोधी मोहिमा आणि डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी चळवळींविरुद्धची कारवाई यांसह राष्ट्रीय सुरक्षेवरही विशेष भर दिला असून, वारसा जतन, संस्कृती, पर्यावरण आणि वन्यजीव संरक्षण या क्षेत्रांवरही लक्ष केंद्रित केलं आहे.

**केंद्रीय समिती**

घुसखोरी आणि इतर कारणांमुळे होणाऱ्या लोकसंख्याशास्त्रीय बदलाच्या आव्हानाचं निवारण करण्याच्या दृष्टीनं केंद्र सरकारनं एका उच्चस्तरीय समितीची स्थापना केली आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी समाज माध्यमावरच्या संदेशातून ही माहिती दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत न्यायमूर्ती प्रकाश नाओलेकर या समितीचे अध्यक्ष आहेत. लोकसंख्या बदलामुळे कोणत्याही देशाच्या सार्वभौमत्व, सुरक्षा तसंच कायदा आणि सुव्यवस्थेपुढे गंभीर आव्हान उभं राहातं; आणि ही समिती अशा बदलांचं समग्र मूल्यांकन करेल, असं अमित शहा यांनी या संदेशात म्हटलं आहे.

**मसाप**

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा 121वा वर्धापन दिन आणि पुरस्कार प्रदान सोहळा काल पुण्यात बालगंधर्व रंगमंदिर इथं अत्यंत दिमाखात साजरा झाला. या वेळी ज्येष्ठ लेखिका प्रतिभा रानडे यांना मसाप जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. तर डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्काराने डॉ. श्रीकृष्ण काकडे यांचा गौरव करण्यात आला. ज्येष्ठ संगीतकार, गायक पंडित सत्यशील देशपांडे, लेखक, दिग्दर्शक, अभिनेते हृषिकेश जोशी, माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांची कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती. चौकटीतल्या जीवनापलिकडचे कठोर वास्तव लेखनातून पहायला शिकले, अशा भावना प्रतिभा रानडे यांनी यावेळी व्यक्त केल्या. विशेष ग्रंथकार पुरस्कार आणि वार्षिक ग्रंथ पारितोषिकंही मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

**राज्यपाल-टीबी मुक्त भारत**

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत काल, मुंबईत, 'टीबी मुक्त भारत' अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. बृहन्मुंबई आणि आसपासच्या परिसरातील दाट लोकवस्तीमुळे टीबीसारख्या संसर्गजन्य रोगांचा प्रसार होण्याचा धोका अधिक आहे. त्यामुळे, या अभियानात लोकसहभाग आवश्यक असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

**एस. टी.-इंधन बचत**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एस. टी. च्या वाढत्या इंधन खर्चावर नियंत्रण मिळवण्यासाठी 'इंधन बचत... म्हणजेच इंधन निर्मिती' ही व्यापक संकल्पना प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्रालयात काल झालेल्या, महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. 'लहान बचतीतून मोठी आर्थिक शिस्त निर्माण होते आणि हीच बचत भविष्यात एसटीसाठी मोठी ताकद ठरू शकते,' असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

**मानव-वन्यजीव संघर्ष**

राज्यात, मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी मोठ्या प्रमाणावर उपाययोजना करण्यात येणार आहेत. या अनुषंगानं 2 शे 60 कोटी रुपयांच्या कृती आराखड्याला, काल मुंबईत, वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या, राज्य वन्यजीव मंडळाच्या, स्थायी समितीच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली. राज्यात पहिल्या टप्प्यात, पोलीस नियंत्रण कक्षाच्या धर्तीवर दहा ठिकाणी नियंत्रण कक्ष उभारणे, एक हजार गावांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सतर्कता सूचना यंत्रणा उभारणे तसेच दोन बचाव आणि दहा उपचार केंद्रे उभारण्यास मान्यता देण्यात आली. या उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश नाईक यांनी यावेळी दिले.

**अपघात**

वाशिम-कनेरगाव रस्त्यावरील देवठाणाजवळ काल झालेल्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला. पिकअप वाहनाने दुचाकीला मागच्या बाजूने जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील तिघांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन लहान मुलींचा समावेश आहे.

**नाशिक धरण मृत्यू**

नाशिक शहरालगतच्या कश्यपी धरण परिसरात फिरण्यासाठी गेलेल्या चौघांचा काल धरणात बुडून मृत्यू झाला तर एका बालकाला वाचवण्यात आलं. काल संध्याकाळी ही घटना घडली. दोन वर्षांचे मूल धरणाजवळ वाहत असल्याचे पाहून एक महिलेने पाण्यात उडी घेऊन त्याला वाचवले. ग्रामस्थांनी चारही मृतदेह पाण्याबाहेर काढले.

**गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यात सिरोंचा इथं अनेक वर्षांपासून वस्ती करून असलेली जवळपास ५०० वटवाघळे मृत्यूमुखी पडली आहेत. सिरोंचा इथं गेल्या काही दिवसात ४५ अंशांच्या पुढे तापमान होतं; त्यामुळे उष्माघातामुळे या वटवाघळांचा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज तालुका पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.चेतन पेदापल्ली यांनी व्यक्त केला आहे. विषाणूजन्य आजार पसरु नये म्हणून मृत वटवाघळांना तेथेच खड्डा करुन पुरण्यात आले, असे वनपरिक्षेत्र अधिकारी सुधीर सुरपाम यांनी सांगितले.

**अवकाळी पाऊस**

हिंगोली जिल्ह्यातील अनेक भागांत काल अवकाळी पाऊस पडला. कळमनुरी तालुक्यातील पिंपरी-येगाव शिवारात, शेळ्या राखत असलेल्या शाळकरी मुलावर वीज पडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला, तर एक महिला गंभीररित्या जखमी झाली.

यवतमाळ जिल्ह्यातल्या महागांव तालुक्यात काल दुपारनंतर वादळ, वारा आणि गारपिटीसह अवकाळी पाऊस पडला. या पावसाचा फटका केळीच्या पिकाला बसला असून, शेतकऱ्यांच्या केळीच्या बागा उद्ध्वस्त झाल्या. वादळी वाऱ्यामुळे, अनेक घरांवरील आणि गोठ्यांवरचे पत्रे उडाले, त्यात, एक वासरू ठार झाले आहे तर काही जनावरं जखमी झाली.

अमरावती शहर आणि परिसरात काल काही ठिकाणी जोरदार तर काही ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला. उकाड्यामुळे हैराण झालेल्या नागरिकांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी विजांसह वादळ, हलका ते मध्यम पाऊस आणि ताशी 40 ते 50 किलोमीटर वेगानं वारे वाहण्याची दाट शक्यता आहे. उत्तर कोकणात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान तर विदर्भात उष्णतेची लाट राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरील प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.